**१०० कोटी वृक्षलागवडीचे उद्दीष्ट साध्य करणे.**

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक. एफडीएम-२०११/प्र.क्र.१०४/भाग-४/फ-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १९ जून ,२०१२.

वाचा :-

१. शासन परिपत्रक क्र.महसूल व वन विभाग क्रमांक. एफडीएम-२०११/प्र.क्र.१०४/फ-२, दि.२५.१०.२०११
२. शासन परिपत्रक क्र.महसूल व वन विभाग क्रमांक. एफडीएम-२०११/प्र.क्र.१०४/फ-२, दि.०९.१२.२०११

**शासन परिपत्रक -**

संदर्भ १ वरील दि.२५.१०.२०११ च्या शासन परिपत्रकान्वये १०० कोटी वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाच्या संदर्भात वृक्ष लागवडीच्या अनुषंगाने जिल्हानिहाय उद्दिष्ट परिपत्रकासोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये जोडण्यात आला असून यामध्ये जिल्हा परिषद, कृषी व शिक्षण सह उद्दिष्ट स्वतंत्र दर्शविले आहेत. याशिवाय, उर्वरित विभागाचे एकत्रित उद्दिष्ट नमूद करण्यात आले आहे. याकरिता सविस्तर सूचना, विभागनिहाय उद्दिष्ट, रोपांचे नियोजन, वृक्ष लागवडीचे नियंत्रण याविषयीच्या मासिक प्रगतीचा आढावा, जिल्हा / विभागीय / राज्य स्तरावर समन्वय करण्याच्या कार्यपध्दतीबाबत दि.२५.१०.२०११ च्या शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. याशिवाय, १०० कोटी वृक्षलागवड कार्यक्रमाच्या अनुषंगाने रोपवाटीका पुर्वपावसाळी कामे व लागवडीच्या कामाच्या संनियंत्रण कार्यपध्दतीच्या संदर्भात संदर्भ २ वरील दि.०९.१२.२०११ च्या शासन परिपत्रकान्वये सविस्तर सुचना दिलेल्या आहेत. सदरहु शासन परिपत्रकान्वये १०० कोटी रोपांपैकी ५० टक्के रोपे २०१२ च्या पावसाळ्यात व उर्वरीत ५० टक्के रोपे सन २०१३ च्या पावसाळ्यात तयार करावयाचे असल्याची सूचना देण्यात आली होती. याशिवाय, राज्यपातळीवर संनियंत्रण कार्यपध्दती उभारण्याच्या अनुषंगाने मुख्य वनसंरक्षक तथा उपमहासंचालक सामाजिक वनीकरण ठाणे यांना नोडल ऑफीसर म्हणून नियुक्त करुन संनियंत्रण आज्ञावलीचा उपयोग करण्यासंदर्भात सुचना देण्यात आल्या होत्या.

वरील सुचनांच्या अनुषंगाने १०० कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम सुव्यवस्थीतपणे पार पाडण्याच्या दृष्टीने खालील निदेश या शासन परिपत्रकान्वये देण्यात येत आहेत.

१. १०० कोटी वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमासंदर्भात वेळोवेळी मा.मुख्य सचिव यांच्याकडून बैठकीद्वारा व Video Conference द्वारा आढावा घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने, केलेल्या सुचनांनुसार सन २०१२ च्या पावसाळ्याकरिता ३० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. तर उर्वरीत ७० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट सन २०१३ च्या

पावसाळ्याकरिता निश्चित करण्यात आले होते. याअनुषंगाने सन २०१२ च्या पावसाळ्यातील वृक्ष लागवडीबाबत सर्व जिल्ह्यासाठी निर्धारीत केलेले उद्दिष्ट परिशिष्ट १ प्रमाणे विचारात घेऊन सर्व जिल्हाधिकारी व सर्व विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या अधिपत्याखालील जिल्ह्यातील निर्धारीत केलेले उद्दिष्ट सन २०१२ च्या पावसाळ्यात पूर्ण केले जाईल याची दक्षता घ्यावी.

२. वनविभागास दि.२५.१०.२०११ च्या शासन परिपत्रकानुसार १६ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले होते. तथापी वनविभागाचे ३० टक्के इतके उद्दिष्ट विचारात न घेता ५० टक्के प्रमाणे ८ कोटी इतके उद्दिष्ट सन २०१२ च्या पावसाळ्याकरिता कायम ठेवण्यात आले असून त्याप्रमाणे वनविभागाने वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात यावी.

३. सामाजिक वनीकरण विभागास दि.२५.१०.२०११ च्या शासनपरिपत्रकानुसार वृक्षलागवडीचे ४ कोटी इतके उद्दिष्ट देण्यात आले होते. तथापी सामाजिक वनीकरण विभागाचेही उद्दिष्ट ३० टक्के विचारात न घेता ५० टक्के प्रमाणे २ कोटी इतके उद्दिष्ट सन २०१२ च्या पावसाळ्याकरिता कायम ठेवण्यात आले असून त्याप्रमाणे सामाजिक वनीकरण विभागाने वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात यावी.

४. वन विभाग व सामाजिक वनीकरण विभाग वगळता अन्य विभागांनी त्यांना दिलेल्या उद्दिष्टापैकी किमान ३० टक्के उद्दिष्ट साध्य होईल याची दक्षता घ्यावी.

५. विभागीय आयुक्तांनी सन २०१२ च्या पावसाळ्याकरिता ५० टक्के रोपे तयार करण्याचे उद्दिष्ट साध्य करुन ३० टक्के रोपे लागवडीचे उद्दिष्ट साध्य करावे.

६. १०० कोटी वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी योग्य होते की नाही याबाबत जिल्हास्तरावर भरारी पथक नेमूण किमान १० टक्के प्रत्यक्ष तपासणी होईल याची दक्षता घ्यावी. याशिवाय ग्रामपंचायत स्तरावरील रोपेलागवडीबाबतचा निरीक्षण अहवाल ग्रामसभेत सादर करुन Social Audit ची कार्यवाही करण्यात यावी.

७. १०० कोटी वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमासंदर्भातील संनियंत्रण (Monitoring) विभागीय आयुक्त स्तरावर विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीने करण्यासंदर्भात दि.२५.१०.२०११ च्या शासन परिपत्रकान्वये सूचना दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने विभागीय आयुक्तांना दर १५ दिवसांनी आढावा घेऊन त्याबाबतचा संपुर्ण अहवाल शासनाकडे पाठवावा.

८. १०० कोटी वृक्ष लागवडीसंबंधी माहिती संकलित करणे व राज्यस्तरावरील एकत्रितपणे सादर करण्याच्या दृष्टीने सहसंचालक सामाजिक वनीकरण, ठाणे यांचे अध्यक्षतेखाली एक समन्वय समिती दिनांक १०-मे, २०१२ च्या शासन निर्णयानुसार स्थापन करण्यात आली आहे. तरी विभागीय आयुक्तांनी खड्डे खोदणे व रोपे लागवडी संबंधीचा अहवाल दर १५ दिवसांनी सदर समितीकडे पाठवावा.

९. मुख्य वनसंरक्षक तथा उपमहासंचालक सामाजिक वनीकरण ठाणे हे सवरहू अहवाल प्रधान सचिव (वने), प्रधान सचिव (जलसंधारण) यांचेकडे पाठवतील.

१०. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईट वर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१२०६१९०६५०५१०२०३ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( विवेक खांडेकर )
सह सचिव, (वने)
महाराष्ट्र शासन.

प्रति,

(०१) मा.राज्यपाल महोदयांचे सचिव.
(०२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
(०३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
(०४) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग
(०५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
(०६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्य जीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
(०७) प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
(०८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर.
(०९) प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा महासंचालक, सामाजिक वनीकरण, पुणे.
(१०) सर्व विभागीय आयुक्त.
(११) सर्व जिल्हाधिकारी.
(१२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
(१३) सर्व महानगर पालिकांचे आयुक्त.
(१४) सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक / मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक.
(१५) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
(१६) आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
(१७) संचालक, नगर पालिका संचालनालय, मुंबई.
(१८) संचालक (फलोत्पादन), महाराष्ट्र राज्य, पुणे
(१९) संचालक (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
(२०) संचालक (उच्च व तंत्र शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
(२१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर.
(२२) महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर.
(२३) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
(२४) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक.
(२५) वन विभागातील सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / विशेष कार्य अधिकारी.
(२६) निवड नस्ती (कार्यासन फ-२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

D:\sec\Van Cons\Van TPP.doc

परिशिष्ट-१

महाराष्ट्र राज्याचे १०० कोटी वृक्ष लागवड योजनेचे जिल्हानिहाय उद्दिष्ट.

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | सन २०१२-१३ साठीचे लक्ष्य (दि.२५.१०.२०१२ च्या परिपत्रकानुसार १०० टक्के) | ५० टक्के नुसार रोपे तयार करण्याचे उद्दिष्ट | ३० टक्के नुसार रोपलागवडीचे सुधारीत उद्दिष्ट |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | ३२९१०००० | १६४५५००० | ९८७३००० |
| २ | रायगड | २९७२०००० | १४८६०००० | ८९१६००० |
| ३ | रत्नागिरी | ३०८००००० | १५४००००० | ९२४०००० |
| ४ | सिंधुदुर्ग | १५६००००० | ७८००००० | ४६८०००० |
| ५ | नाशिक | ४९०२०००० | २४५१०००० | १४७०६००० |
| ६ | धुळे | १९९४०००० | ९९७०००० | ५९८२००० |
| ७ | नंदुरबार | १८१३०००० | ९०६५००० | ५४३९००० |
| ८ | जळगांव | ४१०६०००० | २०५३०००० | १२३१८००० |
| ९ | अहमदनगर | ४६६००००० | २३३००००० | १३९८०००० |
| १० | पुणे | ४९९३०००० | २४९६५००० | १४९७९००० |
| ११ | सातारा | ५३६२०००० | २६८१०००० | १६०८६००० |
| १२ | सांगली | २५५२०००० | १२७६०००० | ७६५६००० |
| १३ | सोलापूर | ३६२१०००० | १८१०५००० | १०८६३००० |
| १४ | कोल्हापूर | ३६२१०००० | १८१०५००० | १०८६३००० |
| १५ | औरंगाबाद | ३१०५०००० | १५५२५००० | ९३१५००० |
| १६ | जालना | २८२७०००० | १४१३५००० | ८४८१००० |
| १७ | परभणी | २५४८०००० | १२७४०००० | ७६४४००० |
| १८ | हिंगोली | २०४५०००० | १०२२५००० | ६१३५००० |
| १९ | बीड | ३५९३०००० | १७९६५००० | १०७७९००० |
| २० | नांदेड | ४६४५०००० | २३२२५००० | १३९३५००० |
| २१ | उस्मानाबाद | २२४८०००० | ११२४०००० | ६७४४००० |
| २२ | लातूर | २८४८०००० | १४२४०००० | ८५४४००० |
| २३ | अमरावती | ३०५१०००० | १५२५५००० | ९१५३००० |
| २४ | अकोला | १९६४०००० | ९८२०००० | ५८९२००० |
| २५ | यवतमाळ | ४२७२०००० | २१३६०००० | १२८१६००० |
| २६ | बुलढाणा | ३१३८०००० | १५६९०००० | ९४१४००० |
| २७ | वाशिम | १७२८०००० | ८६४०००० | ५१८४००० |
| २८ | नागपूर | २८०९०००० | १४०४५००० | ८४२७००० |
| २९ | वर्धा | १८७१०००० | ९३५५००० | ५६१३००० |
| ३० | भंडारा | १९५८०००० | ९७९०००० | ५८७४००० |
| ३१ | गोंदिया | २०१३०००० | १००६५००० | ६०३९००० |
| ३२ | चंद्रपूर | ३०६६०००० | १५३३०००० | ९१९८००० |
| ३३ | गडचिरोली | १६९००००० | ८४५०००० | ५०७०००० |
| | एकूण | १०००००००० | ५००००००० | ३००००००० |